# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@org.in Internet :http/www.dte.org.in

**अधिसूचना**

क्रमांक : २अ/एडीएम/अंतिम दिनांक/२००६/१५८६

दिनांक : १८ सप्टेंबर २००६

**शैक्षणिक वर्ष २००६-२००७ मधील प्रथम व द्वितीय वर्ष व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या अंतिम दिनांक (Cut off Date) बाबत . . . . .**

शैक्षणिक वर्ष २००६-२००७ मधील प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम तसेच प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी (एचएमसीटी) आणि थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाच्या अंतिम तारखा **(Cut off Dates)** खालीलप्रमाणे जाहिर करण्यात आलेल्या आहेत.

| Name of Course | Cut off Date |
|---|---|
| 1st year MBA/MMS | 16/08/2006 |
| 1st year MCA | 16/08/2006 |
| 1st year B. E. (Engg.) | 23/09/2006 |
| 1st year B. Pharmacy | 23/09/2006 |
| 1st year B.HMCT | 23/09/2006 |
| 1st year B.Arch. | 23/09/2006 |
| Direct 2nd year Degg. Engg. | 31/08/2006 |
| Direct 2nd year B. Pharmacy | 31/08/2006 |

**प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी** अभ्यासक्रम चालविणाऱ्या शासकीय / शासकीय अनुदानित संस्थांमधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागा प्रवेश नियमावलीतील नियम क्र. ८.६ नुसार भराव्यात.

**प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी** पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या शासकीय, शासकीयय अनुदानित व विद्यापीठ व्यवस्थापित संस्थांनी संबंधित संस्थेत विहित मुदतीत प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जामधून गुणवत्तेने व पारदर्शकता ठेवून रिक्त जागा भरण्यात याव्यात. विनाअनुदानित संस्थांनी संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमावलीतील **Annexure-III** मध्ये नमूद केल्यानुसार गुणवत्तेने व पारदर्शकता ठेवून रिक्त जागा भरण्यात याव्यात. **सर्व संस्थांनी रिक्त जागांची माहिती संस्थेच्या वेबसाईटवर, सूचना फलकावर ठळकपणे प्रसिध्द करण्यात यावी. सदर रिक्त जागांच्या प्रवेशासंबंधी कमीत कमी दोन अग्रगण्य वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी.**

( प्रा. न. बा. पासलकर )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

continued on page 2

## संचालनालयाची अधिसूचना क्र. २अ/अंतिम दिनांक/२००६/१५८६, दि.१८/०९/२००६ बाबत खुलासा

सर्व शासकीय, अनुदानित, विद्यापीठ विभाग आणि विद्यापीठ व्यवस्थापित संस्थांमधील प्रथम वर्ष **अभियांत्रिकी पदवी** अभ्यासक्रमांच्या रिक्त राहिलेल्या जागा नियमावलीतील नियम क्र.६.७ नुसार भरण्यात याव्यात.

सर्व शासकीय, अनुदानित, विद्यापीठ विभाग आणि विद्यापीठ व्यवस्थापित संस्थांमधील प्रथम वर्ष **औषधनिर्माणशास्त्र पदवी** अभ्यासक्रमांच्या रिक्त राहिलेल्या जागा नियमावलीतील नियम क्र.६.५ नुसार भरण्यात याव्यात.